Dnyandeep Shikshan Prasarak Mandal, Chandrapur

# Dr. Khatri Mahavidyalaya, Tukum Chandrapur

डॉ. खत्री महाविद्यालयात 'तारामंडळ ओळख' विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

चंद्रपूर :

स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम येथे कनिष्ठ विभागाच्या विज्ञान मंडळाकडून विद्यार्थ्यांसाठी तारामंडळ (फिरते नभांगण) ओळख या विषयावर मार्गदर्शनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम संकलन महाराष्ट्र राज्य सहकार्य व वैज्ञानिक जाणीव शिक्षण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून पी. एम. जाधव व संजय कांबळे यांनी विद्यार्थ्यांना तारामंडळांची रचना, विविध ग्रहांची माहिती, अवकाशगंगेची निर्मिती तसेच पृथ्वीच्या ग्रहांचे कालचक्र याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात व्हिडिओ चित्रफितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अवकाशशास्त्राची ओळख करून देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत शास्त्रीय माहितीची नोंद घेतली. सदर कार्यक्रमाला संस्थेचे सचिव डॉ.एस.बी.कपूर सर , कोषाध्यक्ष प्रा. अनुश्री पाराशर मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुवर्णा राऊत यांनी केले, तर मान्यवरांचे आभार डॉ. दिपाली दांडेकर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. शेख, प्रा. लेनगुरे, प्रा. डोंगरवार, प्रा.तडफदार , प्रा. नाट, प्रा. नागपुरे, प्रा. पॉल, प्रा.रोहनकर, प्रा. गायकवाड, प्रा. सादलवार, प्रा. मोहितकर तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.




